# मोटार अपघात दावा अर्ज क्र.११६/२०१७ मधील नि.६ खालील

## आदेश

अर्जदार यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १६६ नुसार केलेल्या मुख्य अर्जात या अर्जाद्वारे त्या अधिनियमाखालील कलम १४० नुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केलेली आहे.

२. अर्जदारांचे कथनानुसार दि.२६/०९/२०१६ रोजी दुपारी ०२.०० वाजताचे सुमारास उंब्रज ते मसुर मार्गावर वडोली भिकेश्वर, ता. कराड, जि. सातारा गांवचे हद्दीत अर्जदार क्र.१ चा पती विजय सुदाम शेडगे, वय–२७ वर्षे, रा. वडोली भिकेश्वर, ता. कराड, जि. सातारा हे बजाज डिस्कव्हर मोटारसायकल क्र.एम्.एच्./११/ए.झेड–१९४८ वर पाठीमागे बसुन उंब्रज बाजुकडून मसुर बाजुकडे जात असताना, सामनेवाला क्र.२ यांच्या मालकीचा टेम्पो क्र.एम्.एच्./०८/डब्ल्यू–०६१९ हा सामनेवाला क्र.१ ने निष्काळजीपणे भरधाव चालवुन विजय शेडगे बसलेल्या मोटारसायकलला पाठीमागुन जोरदार धडक दिली आणि त्या अपघातामध्ये विजय शेडगे हे गंभिररित्या जखमी होवून उपचारा दरम्यान जागेवरच मयत झाले. अपघाताचे वेळी सदर टेम्पो सामनेवाला क्र.२ यांच्या मालकीचा होता आणि वाहनाचा विमा सामनेवाला क्र.३ मॅगमा एच.डी.आय. जनरल इन्शुरन्स कंपनी लि. या विमा कंपनीकडे उतरविलेला असल्याने सर्व सामनेवाले नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहे.

३. सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी म्हणणे दिलेले नाही.

४. अर्जदारांनी यादी नि.४ सोबत हजर केलेले अपघातासंबंधीचे तळबीड पोलीस स्टेशन मधील दि.२६/०९/२०१६ रोजी नोंदविलेल्या गु.र.क्र.५५/२०१६ मधील प्रथम वर्दी अहवाल यावरुन अर्जदारांच्या कथनाप्रमाणे वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी अपघात झाल्याचे आणि सदरहू वाहने त्या अपघातात सामील असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

५. अर्जदार यांनी हजर केलेल्या विमा प्रमाणपत्राची प्रत सकृतदर्शनी असे दर्शविते की, टेम्पो क्र.एम्.एच्./०८/डब्ल्यू–०६१९ चा सामनेवाला क्र.३ यांचेकडे सामनेवाले क्र.२

यांनी मालक या नात्याने दि.२२/०९/२०१६ ते २१/०९/२०१७ या कालावधीसाठी विमा उतरविलेला होता आणि अपघाताचे दिवशी सदरहू वाहन सामनेवाला क्र.३ यांच्याकडे विमा संरक्षित होते.

६. अर्जदार यांनी हजर केलेले शव विच्छेदन अहवाल व मरणोत्तर पंचनामा यावरुन असे स्पष्ट होते की, विजय सुदाम शेडगे यांचा अपघातामध्ये गंभीर जखमी झाल्यामुळे मृत्यू झालेला आहे. वरील सर्व परिस्थितीत अर्जदार हे कलम १४० अन्वये अंतरिम नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत आणि सामनेवाला क्र.२ व ३ हे स्वतंत्र आणि संयुक्तिकरित्या सदर नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. सबब खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.२ व ३ यांनी स्वतंत्र आणि संयुक्तिकरित्या नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु.५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) या आदेशापासून ३० दिवसांचे आत अर्जदार क्र.१ यांना रु.३५,०००/- (रु.पस्तीस हजार फक्त) आणि अर्जदार क्र.२ ते ४ यांना प्रत्येकी रु.५,०००/- (रु.पाच हजार फक्त) प्रमाणे रेखांकित धनादेशाद्वारे देण्यात यावेत. अर्जदार क्र.२ हा अज्ञान असल्याने त्याच्या हिश्याची रक्कम तो सज्ञान होईपर्यंत कोणत्याही राष्ट्रीयीकृत बॅंकेमध्ये मुदत ठेव स्वरुपात ठेवण्यात यावी व त्यास त्याची अज्ञान पालन कर्ती म्हणून त्याची आई अर्जदार क्र.१ श्रीमती प्रियांका विजय शेडगे यांचे नाव लावण्यात यावे. सदरहू रक्कम मुदतीत न दिल्यास त्यावर अर्ज दाखल तारखेपासुन संपूर्ण रक्कम फिटेपर्यंत द.सा.द.शे.७.५ टक्के दराने व्याज देण्यास सामनेवाला क्र.२ व ३ जबाबदार राहतील.

३. येणेप्रमाणे अंतरिम निवाडा करण्यात यावा.

सातारा
दिनांकः१०/१०/२०१७

(रा. ना. लड्ढा)
अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
सातारा.